महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी

# कृषी विद्यान संकुल, काष्टी

**KVS NEWS**

## कृषि विज्ञान संकुल येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

कृषि विज्ञान संकुल, मालेगाव अंतर्गत कृषि महाविद्यालय, कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, उद्यानविद्या महाविद्यालय, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय, कृषि तंत्रनिकेतन यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या क्षत्रिय संचालनालयाने दिलेल्या आराखड्यानुसार दि. २१ जून २०२३ रोजी सकाळी ७.०० वाजता आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त कृषि विज्ञान संकुलाच्या क्रीडांगणावर योग वर्गाचे आयोजन करण्यात आले.

कृषि विज्ञान संकुला अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना आयोजित योग दिनाच्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कृषि विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. सोमनाथ सोनवणे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना योग दिनाचे महत्व व योगाचे आरोग्यासाठीचे फायदे याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थी कल्याण अधिकारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय पाटील यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना सादर केली. कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रकल्प अधिकारी डॉ. कानवडे, उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्रकल्प अधिकारी डॉ. दिनेश बिरारी व क्रीडा अधिकारी प्रा. हेमंत कपिले हे सर्व योग वर्गास उपस्थित होते.

या योग वर्गास कृषि विज्ञान संकुलाच्या क्रीडांगणावर योग शिक्षक श्री. आर. जे. निकम व श्री. राहुल शेरमाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी ७.०० वाजता योग वर्गाचे आयोजन करण्यात आले. यादरम्यान सर्व प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी योगाचे वेगवेगळे आसने, प्राणायम करून योगसाधना केली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी योग वर्गास लागणारी सर्व मदत केली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. श्वेता देवकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तसेच डॉ. प्रकाश तापकीर यांनी आभार प्रदर्शन केले.



# महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी
# कृषी विद्यान संकुल, काष्टी

## KVS NEWS





**मालेगाव : येथील कृषी विज्ञान संकुलात योग दिन साजरा करताना शिक्षक व विद्यार्थी. दुसऱ्या छायाचित्रात टेहेरे येथील समता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात योगासने करताना विद्यार्थी, शिक्षक.**

# मालेगावला योग दिन उत्साहात

## कृषी विज्ञान संकुलसह शाळांमध्ये योगासनांची प्रात्यक्षिके

**▸ सकाळ वृत्तसेवा**

मालेगाव, ता. २१ : शहर व परिसरातील विविध शाळांसह कृषी विज्ञान संकुलातंर्गत असलेली सर्व महाविद्यालयांमध्ये बुधवारी (ता. २१) जागतिक योगदिन उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वच ठिकाणी विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद देत योगासनाचे महत्त्व, प्रात्यक्षिके करत आजचा दिवस साजरा केला.

**कृषी विज्ञान संकुल**

मालेगाव येथील कृषी विज्ञान संकुल अंतर्गत कृषी महाविद्यालय, कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, उद्यानविद्या महाविद्यालय, कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय, अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी तंत्रनिकेतन यांच्यातर्फे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त कृषी विज्ञान संकुलाच्या क्रीडांगणावर योग वर्ग पार पडला. कृषी विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. सोमनाथ सोनवणे विद्यार्थ्यांना योग दिनाचे महत्त्व व योगाचे आरोग्यासाठीचे फायदे याबद्दल मार्गदर्शन केले. विद्यार्थी कल्याण अधिकारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय पाटील यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रकल्प अधिकारी डॉ. कानवडे, उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्रकल्प अधिकारी डॉ. दिनेश बिरारी व क्रीडा अधिकारी प्रा. हेमंत कपिले हे सर्व योग वर्गास उपस्थित होते. कृषी विज्ञान संकुलाच्या क्रीडांगणावर योग शिक्षक आर. जे. निकम व राहुल शेरमाळे यांच्या मार्गदर्शनाखाली योगासने पार पडले. प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी योगाचे वेगवेगळे आसने, प्राणायम करून योगसाधना केली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी योग वर्गास लागणारी सर्व मदत केली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. श्वेता देवकर, नेहा काळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रकाश तापकीर यांनी आभार मानले.

**मालेगाव हायस्कूल**

येथील मालेगाव हायस्कूलमध्ये जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. क्रीडाशिक्षक अब्दुल खालिक यांनी विद्यार्थ्यांकडून योगाचे प्रात्यक्षिके करून घेतले. यावेळी मुख्याध्यापक जाहिद हुसैन, जमाल नासिर, फारुख शेख, रहेमानी हसन, इजहार अतिक अहमद, काजी नासिर अली, तसलीम अरीफ आदी उपस्थित होते.

**समाजश्री डॉ. प्रशांत दादा हिरे विद्यालय**

रावळगाव (ता. मालेगाव) येथील योगी रामसुरतकुमार शैक्षणिक संस्था मालेगाव संचालित समाजश्री डॉ.प्रशांतदादा हिरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा करण्यात आला. प्राचार्य व्ही. जे. सोनवणे यांनी योगासनांचे महत्त्व व विद्यार्थ्यांना नियमित योगासनांचा सराव करण्यास सांगितले. क्रीडा शिक्षक भारत ठाकरे यांनी विद्यार्थ्यांकडून योगासनांचा सराव व प्रात्यक्षिक करून घेतले. उपप्राचार्य श्री. कुलकर्णी, पर्यवेक्षक मोरे, विद्यार्थी, विद्यार्थिनी शिक्षक, पालक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी योगासनांचा सराव केला.

**लोकनेते व्यंकटराव हिरे ॲकॅडमी**

लोकनेते व्यंकटराव हिरे ॲकॅडमी सीबीएसई येथे आंतरराष्ट्रीय योगा दिन साजरा करण्यात आला. यावेळी योग विषयाचे महत्त्व विशद करण्यात आले. क्रीडा शिक्षक आर. जी. निकम यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. शेरमाळे यांनी विद्यार्थ्यांसमोर योगासनाचे प्रात्यक्षिक करून दाखवले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.

**समता शाळा टेहेरे**

टेहेरे (ता. मालेगाव) येथील समता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे सचिव ज्ञानेश्वर पाटील यांनी योग मार्गदर्शकाची भूमिका पार पाडली. आर. एन. बच्छाव, डी. एन. गवळी यांनी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना योगासने शिकविले. श्री. पाटील यांनी नियमित योगासने व प्राणायामाचे फायदे सांगितले. प्राचार्य एन. डी. बोरसे, पर्यवेक्षिका जे. डी. अहिरे, योग गुरू अनिल शेवाळे, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

**राजीव गांधी इंटरनॅशन स्कूल**

दाभाडी (ता. मालेगाव) येथील राजीव गांधी इंटरनॅशनल स्कूलमध्ये आरोग्य संपदा हॉस्पिटल येथील योगसेविका आरती साखला, नीता सोनावणे, माधवी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली योगदिवस साजरा करण्यात आला. प्राचार्या शबनम शेख यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रमुख पाहुण्यांसह विद्यार्थ्यांसह संगीत योगा केला. आठवी ते दहावीच्या विद्यार्थिनींनी ॲरोबिकचे प्रात्यक्षिक केले. विद्यार्थांनी पारंपारिक योगा करून शरीर सुदृढता विषयी जागरूकता निर्माण केली. क्रीडाशिक्षक उदय कदम, युवराज डोळे, जयश्री ठोके यांनी योगाविषयी मार्गदर्शन केले. प्रणाली पवार यांनी सूत्रसंचालन केले. विद्यार्थिनी सोनम पाटील हिने आभार मानले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.